## फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २०० नुसार फिर्यादीची शपथेवर तपासणी

मी शपथपुर्वक निवेदन करतो की –

माझे नाव – पोली ॲन्थोनी थंडारस्सरी.

वय – ४७ वर्षे, धंदा – नोकरी.

राहणार –रोहा.

फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. सावं हजर –

१. मी फिर्यादी कंपनीत नोकरीस असून सदर कंपनीने मला प्राधिकृत केले आहे. या कंपनीचा धाटाव औद्योगीक क्षेत्रात कारखाना आहे. आरोपीस मी ओळखतो. त्याचे श्वेता एंटरप्रायझेस या नावाची कंपनी आहे. आम्ही आरोपीस आमच्या कंपनीसाठी लागणाऱ्या मशिनबाबत दि.१.६.२०12 रोजी पर्चेस ऑर्डर दिली होती. त्यानुसार आरोपीने ती स्विकारुन त्यातील अटी व शर्ती कबूल केल्या. त्या ऑर्डर नुसार आरोपीकडून आमच्या कंपनीत इन्व्हाइस नुसार माल आला. या इन्व्हाइस नुसार सदर मशिनची रक्कम व त्यावरील १२.५ टक्के वॅट याची आमच्याकडे मागणी करण्यता आली होती. त्यानुसार मशिनची रक्कम व वॅटची रक्कम मिळून संपूर्ण रक्कम रुपये ३७,७०,५५०/– आम्ही आरोपीस दिले. आरोपीने त्यापैकी वॅटची रक्कम ४,१८,९५०/– रुपये ही शासनाकडे जमा करणे आवश्यक होते.

२. या वॅटच्या रक्कमेचा शासनाच्या विक्रीकर उप आयुक्त, अलिबाग विभाग यांच्याकडे आम्ही परतावा मागितला. परंतू सदर वॅटची रक्कम आरोपीने त्या कार्यालयात जमा केली नसल्याने सदर कार्यालयाने आमच्याकडे दंडासहीत वॅटच्या रक्कमेची मागणी करणारी नोटीस पाठविली. त्यामुळे आम्ही सदर

नोटीसमध्ये मागणी करण्यात आलेली रक्कम त्या कार्यालयात भरली. आम्हाला सदर मागणी नोटीस ही सन २०१८ साली आली होती. आरोपीने आमच्याकडून घेतलेले वॅटचे पैस संबंधीत कार्यालयात भरले नाही त्यामुळे आम्हाला ते भरावे लागले. त्यामुळे आमच्या कंपनीचे आर्थिक नुकसान झाले. अशाप्रकारे आरोपीने आमचा विश्वासघात करून आमची फसवणूक केली. तरी विनंती की, घटनेची चौकशी होवून आरोपीस शासन व्हावे.

मला माझी तपासणी विधीज्ञांच्या हजेरीत वाचून दाखवली, बरोबर लिहिले आहे म्हणून मी खाली सही करतो.

फिर्यादीची सही/आंगठा

माझे समक्ष

--स्वाक्षरी--
(स. दि. कमलाकर)
दि. २०.९.२०१९ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रोहा.